# कला आणि मुद्रणकलेचा विकास क्रम

**डॉ. सचिन रामराव हजारे**
पी.आर.पाटिल कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अमरावती

**डॉ. किशोर दिगांबर इंगळे**
शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर

**सारांश**

प्रागैतिहासिक काळापासूनच मनुष्य आपले दुःख, भिती, आनंद यासारखे भाव विविध प्रकारे विविध माध्यमातून व्यक्त करीत आला आहे. ज्यांच्याकडे आज आपण कलेचे प्रारंभिक स्वरूपाचे पुरावे म्हणून नक्कीच बघू शकतो, याच आधारावर आपण प्राचीन मानवी संस्कृती आणि सभ्यतांचा विकास क्रम समजून घेऊ शकतो. मानवाने दिवसेंदिवस केलेल्या विविध क्षेत्रातील प्रगती मुळे विविध कलाप्रकार सुद्धा निर्माण झाल्याचे बघायला मिळते. कलेतील इतर कला प्रकारांसोबतच गूहामधील छापा चित्रांच्या स्वरूपात मुद्रण कलेची झालेली सुरुवात सुध्दा टप्प्याटप्प्याने विकसित होऊन आज ललितकले अंतर्गत येणाऱ्या इतर कलाप्रकारा प्रमाणेच एक प्रमुख कला प्रकार म्हणून स्थान मिळवण्यात यशस्वी झालेली आहे. जसा जसा समाज प्रगत होत चालला आहे तसं तशी कला सुध्दा आधुनिक होत आहे. आणि हाच बदल आपल्याला पारंपरिक कलेमध्ये व मुद्रण कलेमध्ये बघायला मिळतो.

**शोध संज्ञा**

कला, मुद्रण, प्रागैतिहासिक, आर्टीस्ट प्रूफ,

**प्रस्तावना**

मनुष्याची उत्पत्ती होण्याआधी पासून ब्रम्हांडात विभिन्न कला अस्तित्वात होत्या. यातील एक प्रकार म्हणजेच मनुष्य जीवन , असे म्हटले तर काही वावगे ठरणार नाही. आज जरी कला हा शब्द मनुष्याने आपल्या सोयीनुसार प्रस्थापित केला आहे. मनुष्याच्या प्रत्येक क्रियांना आज कलेमध्ये समाविष्ट केले असून कला मनुष्याचे अनुभव व भावना व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे. मानवाला निसर्ग व समाजाकडून अनेक अनुभव येत असतात हे अनुभव तो विभिन्न माध्यमाच्या साहयाने व्यक्त करीत असतो. इतर कोणत्याही माध्यमांपेक्षा कलेच्या साहयाने जे संदेश, भाव, विचार व्यक्त होतात ते सर्वात प्रभावी पणे दुसऱ्या व्यक्ती पर्यंत पोहचवतांना कलेतून सौंदर्याची अनुभूती तर येतेच, परंतु मानवी जीवनमान उंचावण्याचे कार्य सुद्धा कलेमुळे घडत असते. कला ही मनुष्य जीवनाचा अविभाज्य घटक आहे व त्यामुळेच मनुष्याच्या अस्तित्वाला एक ओळख मिळते.

आज मनुष्य हा विविध कलांनी वेढलेला आहे, एवढेच काय तर त्याचे हसणे, रडणे, ओरडणे, चिडणे हे मानवी सहज भाव सुद्धा कला असू शकतात. भारतीय पुराणामध्ये ६४ विविध कलांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या कलांमध्ये आता वाढ झालेली दिसत आहे. कलेने आधुनिकतेची झालर पांघरली असून आज सर्वच कलाप्रकार मोठ्या दिमाखात आविष्कृत होताना दिसत आहे.

**कला म्हणजे काय ?**

आजच्या या आधुनिक युगात कलेची व्याख्या करणे म्हणजे अफाट समुद्रातून मोती काढणे ऐवढे कठीण कार्य आहे. बदलत्या युगात, बदलत्या प्रवाहात केलेले गाढलेली उंची, तंत्रज्ञनाद्वारे होणारे कलेचे प्रगटीकरण असे वेगवेगळे पैलू आपल्याला बघायला मिळतात. हजारो वर्षा पूर्वीची प्रागैतिहासिक कला आणि २१ व्या शतकातील संगणकाच्या मदतीने तयार करण्यात येणारी कला यामध्ये प्रचंड बदल बघायला मिळतो आणि याच मुळे उद्या निर्माण होणाऱ्या कला ह्या शब्दाची व्याप्ती व व्याख्या काय असेल हे सांगने कठीण झाले आहे.

आज पर्यंत बऱ्याच पाश्चात्य व भारतीय विचारवंत, कलावंत, संत व सौंदर्य शास्त्रज्ञांनी कलेवर आपले विचार व्यक्त केले आहे. प्रत्येकाचा कलेकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगवेगळा असल्याचे लक्षात येते. व्याख्या सुद्धा त्यांनी अनेक अर्थाने केल्या आहे. त्याच आधारे कलेच्या परंतु सर्वच महान विचारकरत्यांनी कलेला मानवी अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम नक्कीच मानले आहे. याच आधारावर आपण निश्चितपणे म्हणू शकतो की, कलाकार ज्या कोणत्या मध्यमाचा वापर करून अव्यक्त भावनांना प्रभावी पद्धतीने व्यक्त करतो ती म्हणजेच कला होय.

**कलेचा अर्थ व व्याख्या :**

कला हा शब्द आंग्ल भाषेच्या 'आर्ट' शब्दाचा सूचक आहे. इंग्रजी कला या शब्दाचा उपयोग हा १३व्या शतका पासून होत आहे. याचा मूळ अर्थ कौशल्य इतकाच होता. १७व्या शतकापासून ह्या शब्दाचा उपयोग हा काव्य, संगीत, चित्र (मुद्राचित्र), वास्तू यासारख्या ललित कले करिता होवू लागला. प्राचीन भारतीय ग्रंथ व वाड्मयामध्ये कलेचा अर्थ आज ज्या अर्थाने केला जातो तो नव्हता. कला शब्द हा संस्कृत भाषेतून आला आहे. विद्वानांनी कला ह्या शब्दाला वेगवेगळ्या अर्थाने प्रस्तुत केले आहे. काहींनी कला शब्दाचा अर्थ सुंदर, कोमल, मधुर व सुख देणारा केला, तर काहींनी कामुक, प्रसन्न करण्यासोबत तर काहींनी 'क' म्हणजेच आनंद देणारी म्हणून स्वीकार केला आहे. संस्कृत साहित्यामध्ये कला ह्या शब्दाचा प्रयोग साधारणता २० अर्थाने झाला आहे. कैशल्य, शिल्प, काव्य, काम, व्यापार, डावपेज या सर्व कार्याना कला ह्या शब्दाशी जोडलेले आपल्याला बघायला मिळते याचाच अर्थ आपण कला हा शब्द अशा सर्व क्रियांना म्हणू शकतो, जिच्यामध्ये थोड्यापण चालाखीची किंवा कल्पनाशक्तीची आवश्कता आहे. परंतु मोनियर विलियम्स ने ऐतिहासिक सिद्धांताचा आभास करून असे मत मांडले आहे की, आज जो अर्थ कलेचा आपण घेतो तो फार नंतरच्या काळात आलेला आहे. यापूर्वी ऋग्वेद, शतपथ ब्राह्मण, षडविंश ब्राह्मण, तैतिरीय आरण्यक यांनी कला वेगळ्या अर्थाने प्रस्तुत केली आहे. आज ज्या अर्थाने कला ह्या शब्दाला घेतो तो अर्थ सर्व प्रथम भरतमुनीच्या नाट्यशास्त्रात बघायला मिळते. जरी सुरुवातीला हा शब्द मूळ कोणत्या अर्थाने वापरला आहे या बद्दल संभ्रम असला तरी, आज अष्टाध्यायी, कौषीतकी ब्राह्मण व इतर अध्ययनकर्त्यांच्या अध्ययनावरून असे स्पष्ट झाले आहे की, हा शब्द ललित कला व त्यासारखा इतर कलेच्या संदर्भात वापरला गेला आहे.

भारतीय कला शास्त्राच्या संदर्भात प्रमाणित पहिला उल्लेख मिळतो तो विष्णुधर्मोत्तर पुराणातील 'चित्रसुत्रम' नावाच्या प्रकरणामध्ये यात भारतीय अनादीत काळापासून चालत असलेल्या चित्रकला परंपराचा सखोल स्त्रोत मिळतो. याच कला आधारावर दुसरा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे महाराज भोजचा 'समरांगण सूत्रधार'. यात वास्तुकला, मूर्तीकला आणि चित्रकलांचा विस्तृत स्वरुपात वर्णन केले आहे. याच प्रकारे काही जैन ग्रंथामध्ये ६४ तर कुठे ७२ कलांचे नाव दिले आहे. प्रबोधन कोषामध्ये सुद्धा ७२ कलांचा उल्लेख केला आहे. ललित विस्तारामध्ये सुद्धा पुरुष कलाच्या स्वरुपात ८६ कलांचे नाव आहेत. त्याचबरोबर कामकलाच्या स्वरुपात ६४ नावांचा उल्लेख आहे. प्रसिद्ध काश्मिरी पंडित क्षेमेंद्र यांनी सुद्धा विभिन्न कलां वर एक पुस्तक लिहिली आहे, जिचे नाव कला विलास आहे. जर कोणत्या भारतीय ग्रंथात सर्वात जास्त कलांचा उल्लेख आहे तर तो यातच.

**व्याख्या :**

**पाश्चात्य मीमांसक :**

प्रसिद्ध तत्ववेत्ते **लियो एन. टॉलस्टॉय** आपल्या 'व्हॉट इज आर्ट' निबंधात कलेची व्याख्या स्पष्ट करतांना म्हणतात, अध्यात्मवादी सांगतात त्याप्रमाणे कला म्हणजे सौंदर्य व परमेश्वराचा संकल्पनाचे प्रकटीकरण नाही. सौंदर्य शास्त्रीय भौतिकवादी म्हणतात त्यामुळे कला म्हणजे साठलेल्या अतिरिक्त उर्जेच्या उत्सर्जनाचा खेळही नाही. कला म्हणजे बाह्य कृतीद्वारे केलेली मानवाच्या भावनांची अभिव्यक्ती नाही. कला म्हणजे आनंददायी वस्तूची निर्मिती नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कला आनंदही नाही. तर कला ही माणसे जोडण्याचे माध्यम आहे. एका समान भावनांमध्ये गुंफणारी गोष्ट आहे. कला ही जीवनासाठी उपरीहार्य असून व्यक्ती आणि मानवतेचे कल्याण यांच्या विकासासाठी ती गरजेची आहे.

**हेंनिरी जेम्स** हे 'दि मिडिल इयर्स' नामक लघुकथेत म्हणतात आपण अज्ञानाच्या अंधकारात काळ करतो जे आपण करू शकतो. ते सारे आपण करतो आपल्या जवळ जे काही आहे ते सारे आपण देतो. आपल्या मनातील शंका ही आपली धुंदी असते आणि आपली ही धुंदी म्हणजेच आपले ध्येय असते. उर्वरित सर्व गोष्टी ह्या कलेविषयीचा वेडेपणा असते.

**फ्रँक लाईट** राईट यांच्या मते कला म्हणजे मानवाच्या उपयोगासाठी योग्य असलेल्या सुंदर प्रकारातील निसर्गामधील मुलभूत तत्वांचा शोध आणि विकास आहे.

**ऑस्कर वाईल्ड** 'दि सोल ऑफ मॉन अंडर सोशलीझम' या आपल्या लेखन कृतीत ऑस्कर वाइल्ड कला म्हणजे जगाला माहित असलेल्या वैयक्तिक वादाचा अत्यंत उत्कृष्ट मार्ग आहे.

**थॉमस मर्टोन** त्यांच्या 'नॉ मैन इज अन आयलैंड' मध्ये म्हणतात कला ही अशी गोष्ट आहे जी आत्मशोध घेण्यासाठी आम्हाला मदत करते आणि त्याच वेळी स्वतःला विसर्जित करायला लावते.

**हर्बर्ट रीड** आपल्या दि मिनिंग ऑफ आर्ट' या पुस्तकात कलेची संकल्पना स्पष्ट करतांना शोपेनहार्वर यांची प्रतिपादनाचा दाखला दिलेला आहे. त्यात **शोपेनहार्वर** म्हणतात की All arts aspire to the condition of music संगीत हा सर्व कलांचा ध्यास आहे. शोपेनहार्वर हे अमूर्त कले बाबत हे विधान करतात ज्यामध्ये दुसऱ्या कुणाचा हस्तक्षेप नसतो. तसेच काही एक संकेत व संदेश देण्याचाही उद्देश नसतो. ही प्रक्रिया त्यांच्या मते केवळ संगीतातून प्रत्ययास येते.

प्रसिद्ध चित्रकार **पाब्लो पिकासोने** कलेविषयी आपले मुक्त विचार प्रगत करतांना म्हटले की, कला हे जीवन आहे. कलांच्या माध्यमाने मनुष्याचा आत्मा स्वतः स्वतःला अभिव्यक्त करत असतो कला साक्षात मनुष्य आहे त्याची आत्मा आहे.

**भारतीय मीमांसक :**

**रवींद्रनाथ टागोर** म्हणतात की,कलेची व्याख्या करणार नाही, परंतु कलेच्या अस्तितत्वाचे कारण काय? हा प्रश्न मात्र स्वतःलाच जरूर विचारीन कुठल्या विशेष हेतूसाठी कला अस्तित्वात आली. अर्थात् कलेची निर्मिती का झाली ते शोधण्याचा प्रयास करणे आमच्या सौंदर्याची आनंदाच्या गरजेची परिपूर्ती करते का ? याचाही शोध घेणार कला ही कुठल्या अनुभूतीचे वा अभिव्यक्तीचे बाह्य रूप आहे काय, याचा शोध घेण्याचा मी प्रयत्न करेन.

**आनंदकुमार स्वामी** यांच्या मते कला ही कलावंताच्या ठायी कायम असते. विविध गोष्टी निर्माण करण्याचे ज्ञान कला प्रदान करते तर कलाकार ही वेगळ्या प्रकारची व्यक्ती असते असे नाही, तर प्रत्येक व्यक्ती वेगळ्या प्रकारचा कलावंत असते. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** म्हणतात जीवनाची स्वच्छता, सुंदरता याचा सर्वात्कृष्ट व परमोच्च अविष्कार 'कला' होय.

**तुकडोजी महाराजांनी** आपल्या ग्रामगीतेद्वारे दिसणे, पाहणे, बोलणे, हसणे, चिडणे या सारख्या मानवी सहज भावना कलेशी जोडले आहे. मुळातच प्रत्येक मनुष्य, प्राण्यांमध्ये गुण-अवगुण हे भाव असतातच या विविध भावांना त्यांनी कलेचा दर्जा दिला आहे.

**महात्मा गांधी** म्हणतात एकाच्या अनुभूतीला दुसऱ्यांपर्यंत पोहोचविणे म्हणजेच कला आहे. महान कलाविद्वान **वासुदेवशरण अग्रवाल** यांच्या मते कला म्हणजे विभिन्न भावांचा पृथ्वीवरील अवतार आहे. **माधवी पारेख** यांच्या शब्दात कला अतिरिक्त ऊर्जा आहे इमानदारीने बघितले तर त्याला पुर्णतः व्यक्तिगत आणि अंतरमनाची अभिव्यक्ती असते. **असितकुमार हल्दार** ने कला संदर्भात आपले विचार व्यक्त करतांना म्हणतात “When I mean by art is some creation of man which appeals of his emotions and his intellect by means of his secess" **भूर्तहरीच्या** म्हणण्यानुसार कला तीच आहे जी आपल्याला परमेश्वरामध्ये विलीन करते. **महाकवि माघ** म्हणतात जे प्रत्येक क्षणी नवीनता आणि सौंदर्याला जागृत करते तीच कला आहे.

**मुद्रणकला म्हणजे काय ? :**

आज मुद्रणकला ही चित्रकला व इतर कला सारखी ललित कलेची शाखा म्हणून मानण्यात येत असली तरी १९ व्या शतकाच्या उत्तरधापर्यंत ही परिस्थिती अशी नव्हती. प्रिंट मेकिंग म्हणजेच मुद्रणकला हे स्वतंत्र नाव अस्तित्वात नव्हते. तर ठसा घेण्याची ही प्रक्रिया 'ग्राफिक' पद्धतीच्या अंतर्गतच येत होती. खरेतर ग्राफिक पद्धत किंवा ठसा पद्धतीची सुरुवात पाश्चात्य अथवा भारतीय प्रागैतिहासिक इतिहास प्रमाणे ३०,००० ते ६०,००० पूर्व पासूनच आहे हे आज अनेक पुराव्यानसह सिद्ध झाले आहे. परंतु येथे एका गोष्टीवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे अगदी प्राचीन ग्रंथ 'हरिक सूत्र' (Diamond Sutra) जो चीन येथे शोधला गेला होता. अथवा भारतामधील मोहेन-जो-दडो इथे सापडलेल्या अति प्राचीन 'मुद्रा' असो, या सगळ्यामधील समान गोष्ट अशी की ह्या तयार करण्यामागील हेतू हा व्यावसायिक, धार्मिक म्हणजेच व्यवहारात्मक होता. पुढे ही बऱ्याच कालावधी पर्यंत साधारणतः सन १९६४ पर्यंत व्यावसायिक आणि व्यक्तिगत कला ह्या दोन्ही प्रकारांचा उल्लेख ‘ग्राफिक कला नावानेच केल जात होता. परंतु, आता यामध्ये तफावत करणे गरजेचे झाले होते. हे काम ललित कलेच्या अंतर्गत ग्राफिक कलेला वेगळे नाव देण्याचे महत्त्वाचे कार्य केले. सन १९६४ ला 'द प्रिंट कौसिंल ऑफ अमेरिका' (The print council of America) या संस्थेने त्यांनी मूळ ठसा चित्रणाचा एका नवीन नावाने उल्लेख करणे सुरु केले ते नाव होते प्रिंट मेकिंग (print making) म्हणजेच मुद्रणकला होय.

मुद्रणकला अंतर्गत येणाऱ्या विविध बाजूंचा अभ्यास करण्याआधी मुद्रण म्हणजे 'ठसा' म्हणजे काय ते बघणे गरजेचे आहे. सरळ भाषेत याची व्याख्या करावयाची झाल्यास 'मुद्रण म्हणजे कागदावर अथवा एखाद्या सपाट पृष्ठ भागावर शाई अथवा शाई सारखा इतर पदार्थ वापरून मजकुराच्या व चित्राच्या प्रती बनविण्याची क्रिया होय'.

आज ही मुद्रण पद्धतीचा विकास हा दोन विभिन्न क्षेत्रात होत असल्याचे दिसते.व्यावसायिक मुद्रण आणि कलात्मक मुद्रण म्हणजेच मुद्रचित्रण जरीही ह्या दोन्ही ही पद्धतींमध्ये काही समानता असल्या तरी, त्यांचा उद्देश व तत्वे वेगवेगळी असल्याचे लक्षात येते. एकीकडे व्यावसायिक मुद्रणाचा परिणाम आज सर्व क्षेत्रात पडताना दिसत असला तरी दुसरी कडे मुद्रणकला पद्धतीने सुद्धा आज ललित कलेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान मिळविले आहे व जागतिक पातळीवर एक स्वतंत्र माध्यम म्हणून विकसित होऊ पाहत आहे. आज मुद्रणकला आपल्या आवडीनुसार वेगवेगळ्या माध्यमात मुद्रा चित्रे तयार करीत आहेत. विविध माध्यमाला घेवून त्यांमध्ये कार्य करण्याच्या पद्धतींचा विचार करता त्या पद्धतींना वेगवेगळया नावाने संबोधण्यात येत आहे. त्यामुळे मुद्रण कलेच्या वेगवेगळया माध्यमांत काम करणाऱ्या कलाकारांचे वर्गिकरण अभ्यासाच्या दृष्टीने शक्य झालेले आहे. यामध्ये प्रामुख्याने पुढील प्रकारांचा समावेश करता येईल.

उठाव मुद्रण (Relif method)

खोद मुद्रण (Intaglio method)

सपाट मुद्रण (Paleography method)

जाळी मुद्रण (Serigraphy method)

सन १९६०च्या इंटरनॅाशनल कॉंग्रेस ऑफ प्लास्टिक आर्टसने मुद्रा रेखनाची व्याख्या केली आहे. ती अशी ज्या छपाईचा मूळ ठसा स्वतःहा चित्रकाराने पत्र, लाकूड, दगड किंवा कोणत्याही अन्य पदार्थावर करून स्वतः त्याची छपाई केली असेल, त्यास ठसा चित्रण म्हणावे. अशा मुद्रा रेखनावर कलावंत स्वहस्ते आपले नाव लिहितो, क्वचित त्यावर क्रमांक व दिनांक ही लिहितो व नंतर ती साधने स्वत: हा नष्ट करून टाकतो. खरेतर जागतिक पातळीवर मुद्रण कलेच्या पूर्ण प्रक्रीयांमध्ये समानता येण्याच्या हेतूने व मोलाचे स्थान मिळण्याच्या दृष्टीने युनेस्को रिपोर्टमध्ये मुद्रचीत्रकार व विक्रेत्यांकरिता काही अटी व नियम स्पष्ट केले आहेत त्याचे पालन करणे अपेक्षित असते. कलाकाराने स्वतःच्या हाताने मुद्रण चित्र तयार करण्याच्या हेतूने दगडावर, लाकडावर, धातूवर अथवा अन्य माध्यमावर स्वतः हा कलाकृतीची रचना करणे बंधनकारक आहे. त्याकरिता कोणाचीही मदत घेणे अपेक्षित नाही, त्यालाच प्लेट (plate) किंवा (matrices) म्हटल्या जाते. ही प्लेट म्हणजे त्याची मूळ कलाकृती नसते. तर याच्या साहयाने तो कधीही मुद्रचित्रण तयार करू शकतो.

१९३० पासून मुख्य छाप्यावर कलाकार हस्ताक्षर करतो अशा प्रकारे सविस्तर स्वाक्षरी असणारे प्रथम मुद्रण चित्र जेम्स मेक्नील व्हिस्लर ने केले होते व त्याने या प्लेट वरून अशा किती प्रती काढल्या आहे ते समजण्या करिता एकूण प्रती व ती कितवी प्रत आहे त्याचा उल्लेख करतो. आर्टीस्ट प्रूफ (Artist Proofs) AP नावाने संबोधतो. उदा. जर त्याने एका प्लेट वरून २५ प्रती काडल्या असेल व त्याने काडलेली प्रत १० असेल तर त्याचा उल्लेख करतांना AP १० / २५ असा करतो. आर्टीस्ट प्रूफ च्या आधी हि मुद्रण कलाकार वेगवेगळ्या proofs घेत असे. त्याचे नाव पुढील प्रमाणे आहे. Trail proofs state proofs, Progressive Proofs, Bon'a Proofs, Artist's Proofs, Presentation Proofs, Printer's Proof, Cancellation Proofs त्याने प्रत वरून किती छापे काढावे याचा जरी काही नियम नसला तरी जितके छापे जास्त काढल्या जातील तितकी प्रत्येक छाप्याला मिळणारी किमत कमी होते. छापे काढणे पूर्ण झाल्यावर त्या प्लेटला नष्ट करून टाकावी किंवा त्यावर धारदार औजाराने असे आकार चिन्ह काढावे. प्रत्येक प्रतीवर त्याने तो छापा कोणत्या माध्यमात केला आहे, त्या माध्यमाचे नाव आणि कोणत्या विषयावर केले आहे त्या विषयाचे नाव त्यावर टाकणे गरजेचे आहे. एवढेच नाही तर मुद्रा चित्रकाराने ट्रायल प्रुफ ह्या साध्या न्यूज प्रिन्ट सारख्या पेपरवर घ्याव्यात कारण मुद्रण प्रक्रियेच्या वेळी त्यावर विविध प्रकारच्या आम्लाचा प्रयोग होत असतो त्यामुळे त्या लवकरात लवकर काम झाल्यावर नष्ट करणे गरजेचे असते व न्यूज प्रिन्ट पेपर हा लवकर नष्ट होतो. त्यामुळे यासारखा कागदाचा वापर ट्रायल प्रुफ साठी करावा. तर फायनल प्रिंटसाठी जो कागद शेकडो वर्ष सुरक्षित राहील अशा कागदाचा वापर करावा.

**निष्कर्ष**

वरील सर्व कला समीक्षक, विचारवंत व कलावंताचे कला म्हणजे काय? या विषयावरील विचारांचा अभ्यास केल्यावर एक गोष्ट लक्षात येते की, कला ही विश्लेषण करायची वस्तू नाही, तर ती आनंद अनुभव करायची आहे. कलेला बुद्धीचा वापरा करून समजून घेऊ शकत नाही तिचा फक्त मनातून आनंद होवू शकतो. कलेला विचार सिद्धांत, नियम, तर्क-वितर्काच्या आधारावर समजने योग्य नाही. तिची ओळखही त्या-त्या कलेमध्ये समरस होण्यामध्ये आहे.

प्रागैतिहासिक काळापासून सुरु झालेला मुद्रणकलेचा प्रवास चित्रकला व शिल्पकलेच्या समांतर विकसित होत आलेला आहे. आज एकविसाव्या शतकात प्रिन्ट मेकिंग संदर्भात असणारे नियमांवर पुर्नविचार करण्याची गरज आलेली आहे.

किंबहुना बऱ्याच देशांमध्ये यावर गंभीर विचार होत आहे. प्रिन्ट ही केवळ आज भिंतीनं वर टांगण्या करीता केलेले चित्र एवढ्याच अर्थाने केल्या जात नाही तर आजचा कलाकार प्रिन्ट मेकिंग या संज्ञे खाली अनेक प्रयोगात्मक कार्य करीत आहेत.

आजच्या या आधुनिक युगात कला आणि मुद्राचित्रण कलेचा विकास क्रमाचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, जस जसे तंत्रज्ञान विकसित होत जाईल तस तसे बदल कलेमध्ये होत जातील व कलेतील सर्व प्रकार प्रगत होत राहतील..

**संदर्भ सूची.**


1. https://www.brainpickings.org/2012/06/22/what-is-art/
2. https://en.wikipedia.org/wiki/The_Middle_Years_(story)
3. Frank Lloyd Wright on architecture, nature, and the human spirit: a collection of quotations, Frank Lloyd Wright,: Pomegranate, San Francisco 2011, P-95
4. The Soul of Man, Oscar Wilde, The Project Gutenberg eBook, P-42
5. http://www.gutenberg.org/files/1017/1017-h/1017-h.htm
6. No Man Is an Island. Thomas Merton, Mariner Books, 2002, P-110
7. Art's Responsibility-Artist as Sponsor of Thought- Michelangelo Pistoletto, July 2010 https://www.philamuseum.org/exhibitions/414.html?page=2
8. The Meaning of Art-Harbert Read, Fabe Paper Editions, Faber & Faber LondonLeon
9. The Golden Pleasure Book of art, Gettings Fred, Paul Hamlyn, London1963, P-9 http://www.impressionnistl.net/degos_edgar.htm
10. Gist of Art, Sloan John, Helen farr Sloan (Assistant), Dover Publications, Inc New York. N.D. 1977, P- 19
11. Introduction of Indian Art. Anand k. Coomarswamy, Munshiram Monoharlal, Delhi
12. http://www.artro.uni.torun.pl/kb/rishikul/coomarswamy.html
13. Art and Tradition, Asit Kumar Haldar, Universal Publishers, 1952, P-34
14. https://www.britannica.com/art/printmaking
15. Indian Printmaker's Guild (Catalogue), P-3
16. कला का सृजनात्मक संसार, डॉ. जय सिंह नीरज, राजस्थान प्रकाशन, जयपूर १९९९, पृ. १६
17. चित्र ओर चित्रकार के संबंध मे पिकासो की मन्यताए, लालचंद श्री वास्तव (कला अंक) पृ. १९०
18. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री ९९९७ मराठी विश्वकोश खंड ३ मुंबई, प्रथम प्रकाशन
19. ग्राम गीता अध्याय १३ ग्रामनिर्माण कला, तुकडोजी महाराज
20. संगीत एवं मनोविज्ञान, डॉ किरण तिवारी, कनिष्ठ पालीशर्स डिस्ट्रीब्यूटर्स, दिल्ली २०१५, पृ.१ भारतीय कला साहित्य एवं संस्कृती, डॉ प्रेमशंकर द्विवेदी, पुर्वोन्दत, पृ. ३५
21. कला आंतरिक ऊर्जा हे, भास्कर भूनेश्वर, कला दिर्घा, लखनऊ २०१३, अंक २६, पृ. २७
22. संस्कृत साहित्य का इतिहास डॉ. प्रीती प्रभा गोयक राजेस्थानी गंथागार, जोधपुर, पृ.१६८
23. भारतीय छापाचित्र कला आदी से आधुनिक काल तक, डॉ. सुनील कुमार, भरतीय कला प्रकाशक, दिल्ली, पृ.१३१